# परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय, मुंबई

## प्रथम घटक चाचणी: २०२३-२०२४

**इयत्ता: सहावी (६वी) 6th** **गुण: ४०**

**विषय: मराठी (द्वितीय भाषा) Marathi 2ND lang.** **वेळ: १.३० मि.**

---

प्रश्न १. खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ६ गुण

पावसाळा हा सर्वांचा आवडता ॠतू आहे. पाऊस ही निसर्गाची देणगी आहे. जुन ते सप्टेंबर हे चार महिने पावसाळा असतो. आकाशात काळे ढग जमू लागतात. सर्वत्र मातीचा सुगंध पसरतो. रानामध्ये मोर पिसारा फुलवून नाचू लागतो. पावसामुळे शेती पिकते. आपल्याला पिण्याचे पाणी मिळते. नदी, नाले, विहिरी भरून वाहू लागतात. पावसाळ्यात वातावरण प्रसन्न व आनंदी वाटते.

प्रश्न:

१) सर्वांचा आवडता ॠतू कोणता आहे?
२) किती महिने पावसाळा असतो?
३) रानामध्ये कोण पिसारा फुलवून नाचू लागतो?
४) पावसाळ्यात सर्वत्र कशाचा सुगंध पसरतो?
५) पावसाळ्यात वातावरण कसे वाटते?
६) कोठे काळे ढग जमू लागतात.

प्रश्न २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) ४ गुण

१) कौलावर काय पडते आहे?
२) पडघम वरती काय पडली आहे?
३) मुग्धाच्या शाळेत कोणता समारंभ होता?
४) पाऊस पडल्यावर कोण नाचू लागले?
५) बाबांनी मुग्धाला नवीन वर्षाला काय दिले होते?

प्रश्न ३. खालीलपैकी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दहा) १० गुण

१) मुग्धाची _______ कळी फुलायला लागली होती. (अबोल, शांत, बोलकी)
२) नाचू लागले ______ सारे आनंदाचे तरंग. (झाडे, पाणी, अंगण)
३) पाहुण्यांनी त्यांच्या लहाणपणीच्या _____ सांगितल्या. (गोष्टी, गाणी, गमतीजमती)
४) मुग्धाने ______ संकल्प केला. (वाचनाचा, लिहिण्याचा, पोहण्याचा)
५) ______ ढगात हरभरे भरडते. (मुले, म्हातारी, आई)
६) थेंबासोबत _______ कोसळते. (ढग, वारा, वीज)
७) मुग्धाने ______ स्पर्धेत प्रथम बक्षीस मिळवले होते. (चित्रकला, गायन, वाचन)
८) प फ ब भ -------- ( य, र, ळ, म)
९) मराठी महिने ------- आहेत. (तेरा, बारा, दहा)
१०) कि की कु कू – कै (का, के, क:की)
११) विजेचा ------- असा आवाज येतो. (कडकड, सरसर, भरभर)

प्रश्न ४.अ) खालील शब्दांना जोडून येणारे शब्द लिहा. २ गुण

१) बारीक अ) उतार

२) जिकडे ब) सारीक
३) दगड क) तिकडे
४) चढ ड) धोंडे

ब) पुढील कामे करण्यासाठी तुमच्या घरी कोणत्या वस्तू वापरतात. (कोणतेही दोन) २ गुण

१) गहू दळण्यासाठी -----------
२) काकडी कापण्यासाठी ----------
३) चहा गाळण्यासाठी ------------
४) मसाला वाटण्यासाठी ----------

क) तड्तड् सारखे कवितेतील नादमय शब्द लिहा. (कोणतेही दोन) २ गुण

प्रश्न ५. सुचनेनुसार उत्तरे लिहा. १४ गुण

अ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)
१) पाणी २) वारा ३) ढग

ब) विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)
१) नवीन २) अबोल ३) प्रश्न

क) कोणत्याही २ पक्ष्यांची नावे लिहा.

ड) कोणत्याही २ रंगांची नावे लिहा.

ई) कोणत्याही २ प्राण्यांची नावे लिहा.

फ) कोणत्याही २ फुलांची नावे लिहा.

ग) अंक अक्षरात लिहा. १ ते २०